## संक्षिप्त

### बावड्यात जमीन मोजणीस विरोध

**बावडा, जि. पुणे :** सरकारने भूसंपादनाचा दर अगोदर जाहीर करावा व त्यानंतरच जमिनीची मोजणी करावी, अशी भूमिका घेत सोमवारी (ता. २७) बावडा (ता. इंदापूर) येथील शेतकऱ्यांनी मोजणीस आलेल्या कर्मचाऱ्यांना माघारी पाठविले. संत तुकाराम महाराज पालखी महामार्गासाठी आमचा विरोध नाही. मात्र जोपर्यंत सरकार भूसंपादनाचा दर जाहीर करीत नाही तोपर्यंत आम्ही जमिनीची मोजणी करू देणार नाही, अशी आक्रमक भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. बारामतीचे प्रांताधिकारी यांनी लुमेवाडी ते गोखळी दरम्यानच्या बाधित शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन केलेल्या संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग संघर्ष कृती समितीशी सार्वजनिकरीत्या चर्चा करूनच पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी कृती समितीचे सदस्य संतोष देशमुख, अशोक भोसले, राजेंद्र कुरळे यांनी केली आहे.

### शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांना डाळिंबाची विक्री

**निरगुडसर, जि. पुणे :** डाळिंबाचे भाव कोसळल्याने वाहतुकीचा खर्चही वसूल होणे अवघड झाले आहे. त्यामुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी पुणे, मुंबईच्या बाजारपेठेकडे पाठ फिरवली असून थेट ग्राहकांना डाळिंब विकण्यावर भर दिला आहे. काही जण आठवडे बाजारात तर काहीजण थेट घरोघरी जाऊन विक्री करीत आहेत. काहींनी नाशिक महामार्गावर स्टॉल लावले आहेत. स्वस्त डाळिंबामुळे ग्राहकांची खरेदीसाठी गर्दी होत आहे.

# जोरदार पावसामुळे उसाच्या लागवडीला वेग

## पुणे विभागात ६२ हजार हेक्टरवर लागवडी; धरणांतील पाणी उपलब्धतेने दिलासा

**पुणे (प्रतिनिधी) :** जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांनी उसाच्या उशिराने लागवडी सुरू केल्या आहेत. गेल्या आठवड्यापासून चांगल्या झालेल्या पावसामुळे आडसाली उसाच्या लागवडीला वेग आला आहे. आत्तापर्यंत विभागात आडसाली उसाच्या ६२ हजार १४ हेक्टरवर लागवडी झाल्या आहेत. येत्या काळात अधिक चांगला पाऊस झाल्यास या ऊस लागवडीच्या क्षेत्रात आणखी वाढ होईल.

पुणे विभागात मुळा, भंडारदरा, कुकडी, उजनी अशा काही धरणांमुळे पाण्याची बऱ्यापैकी उपलब्धता आहे. यंदा ही धरणे भरत आली आहे. मात्र, इतर पिकांच्या तुलनेत ऊस पीक हे शाश्वत उत्पन्न म्हणून शेतकरी ऊस पिकांकडे पाहतात. त्यामुळे बहुतांशी शेतकरी दरवर्षी उसाच्या लागवडी करतात. जूनमध्ये दहा ते वीस, जुलै महिन्यात पावसाचा चांगलाच खंड पडला होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी उसाऐवजी सोयाबीन, तूर, मूग आदी कमी पाण्याच्या पिकांवर भर दिला आहे. त्यामुळे ऊस लागवडीत घट झाल्याचे चित्र आहे. चांगला पाऊस झाल्यास ऊस लागवडी याच काळात एक लाखाहून अधिक क्षेत्रावर होतात. सुरवातीच्या काळात कमी झालेल्या पावसामुळे



उसाच्या क्षेत्रात घट झाल्याची स्थिती आहे.

दरवर्षी शेतकरी आडसाली, पूर्व हंगामी, सुरू अशा तीन हंगामात उसाच्या लागवडी करतात. जून ते जुलै महिन्यात आडसाली उसाच्या शेतकरी प्रामुख्याने लागवडी करतात. लागवड केल्यानंतर साधारणपणे पंधरा ते सतरा महिन्यांनी ऊस साखर कारखान्यास तोडणीस देतात. पुणे विभागात उसाचे एकूण सरासरी तीन लाख ७३ हजार १२९ हेक्टर क्षेत्र आहे. विभागातील नगर जिल्ह्यात शेवगाव, राहुरी, श्रीगोंदा, कर्जत, नेवासा, पाथर्डी, राहाता या तालुक्यांत बऱ्यापैकी लागवडी झाल्या आहेत.

पुणे जिल्ह्यातील शिरूर, दौंड, बारामती, इंदापूर, हवेली, जुन्नर, पुरंदर या तालुक्यांत लागवडी झाल्या आहेत. मुळशी, भोर, मावळ, वेल्हे, खेड, आंबेगाव या तालुक्यात अजूनही उसाच्या लागवडी झालेल्या नाहीत. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा, माळशिरस, पंढरपूर, करमाळा, दक्षिण सोलापूर या तालुक्यांत उसाच्या लागवडी झाल्या आहेत. तर उत्तर सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, सांगोला ही तालुके ऊस लागवडीपासून दूर असल्याचे चित्र आहे.

**जिल्हानिहाय आडसाली उसाच्या झालेल्या लागवडी (क्षेत्र, हेक्टरमध्ये)**

| जिल्हा | सरासरी क्षेत्र | आडसाली ऊस लागवड | टक्के |
|---|---|---|---|
| नगर | १,०४,३३७ | ३३,०६२ | ३२ |
| पुणे | १,२४,७५१ | २१,७०४ | १७ |
| सोलापूर | १,४४,०४१ | ७२४८ | ५ |
| एकूण | ३,७३,१२९ | ६२,०१४ | १७ |

# पुणे जिल्ह्यात पाऊस ओसरला, विसर्गही घटला

**पुणे (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील पावसाचा जोर ओसरला असून, पावसाच्या तुरळक सरी पडत आहेत. मंगळवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांमध्ये जिल्ह्याच्या पश्चिम भागात हलक्या ते मध्यम पावसाने हजेरी लावली. पाणलोटातून आवक मंदावल्याने धरणांतील पाण्याचा विसर्गही कमी करण्यात आला आहे.

सह्याद्रीच्या पूर्व उतारावर असलेल्या मावळ पट्ट्यात अनेक ठिकाणी पावसाची रिमझिम सुरू असली तरी, उर्वरित जिल्ह्यात मात्र पावसाने उघडीप दिली आहे. मंगळवारी सकाळपासून ढगाळ हवामानासह तुरळक ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी येत होत्या. धरणांच्या पाणलोट क्षेत्रातून पाण्याची आवक घटली आहे. त्यामुळे खडकवासला, वीर धरणासह सर्वच धरणांमधून पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. सोमवारी



खडकवासला धरणातून सुरू असलेला १८ हजार क्युसेकचा विसर्ग मंगळवारी सकाळी ८५६ करण्यात आला होता. मंगळवार (ता. २८) सकाळी आठ वाजेपर्यंतच्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात पडलेला पाऊस (मिलिमीटरमध्ये) : घोटावडे १५, माले १८, मुठे २६, भोर २३, भोलावडे ३५, आंबवडे १५, संगमनेर २२, निगुडघर २३, काले १५, कार्ला २४ लोणावळा २२, पानशेत ११, राजूर १४.

# मदनवाडी तलाव कोरडा ठणठणीत

**शिर्सुफळ, जि. पुणे :** जिल्ह्याच्या पश्चिम भागातील धरणे भरून वाहू लागली असताना बारामती तालुक्यातील सिद्धेश्वर निंबोडी गावाच्या पाणीपुरवठा योजनेसह परिसरातील गावांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेल्या मदनवाडी तलाव गेल्या अनेक महिन्यांपासून कोरडा आहे. त्यामुळे गावांचा पाणीप्रश्न तीव्र झाला आहे. खडकवासला कालव्याच्या आवर्तनातून वितरिका क्रमांक ३६ आणि ४० मधून मदनवाडी तलावात प्राधान्याने पाणी सोडण्याची मागणी ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
गुरुवार, ३० ऑगस्ट २०१८ रोजी
विषय – ऊस उत्पादन वाढीचे तंत्र
वक्ते – प्रा. अमोल शास्त्री
(विषय विशेतज्ज्ञ, कृषी विद्या, केव्हीके, सोलापूर)
स्थळ – केदारेश्वर मंगल कार्यालय, कंदलगाव, द. सोलापूर, जि. सोलापूर
वेळ – सकाळी ९ वा.
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# मतदार याद्या विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहीर

**पुणे (प्रतिनिधी) :** निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्यात सर्व विधानसभा मतदारसंघांच्या छायाचित्र मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुन:रिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. मतदार याद्या प्रसिद्ध केल्यानंतर ज्या पात्र मतदारांची नावे समाविष्ट केली गेलेली नाहीत, अथवा प्रारूप मतदार यादीमध्ये करण्यात आलेल्या नोंदीबाबत आक्षेप घ्यावयाचे असतील किंवा त्यामध्ये दुरुस्ती, सुधारणा करावयाच्या असल्यास, अशा मतदारांनी विहित नमुन्यामध्ये अर्ज करता येईल.

एक जानेवारी २०१९ रोजी ज्या भारतीय नागरिकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी नाही, म्हणजेच ज्यांची जन्मतारीख एक जानेवारी २००१ वा त्यापूर्वीची आहे व जो सामान्य रहिवासी आहे, अशी व्यक्ती मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र राहील. एक सप्टेंबर २०१८ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्यानंतर ज्या पात्र मतदारांची नावे समाविष्ट केली गेलेली नाहीत, अथवा प्रारूप मतदार यादीमध्ये करण्यात आलेल्या नोंदीबाबत आक्षेप घ्यावयाचे असतील किंवा त्यामध्ये दुरुस्ती, सुधारणा करावयाच्या असल्यास अशा मतदारांनी विहित नमुन्यामध्ये अर्ज करणे आवश्यक आहे. हे अर्ज एक सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत प्रत्येक विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० अन्वये विहित कार्यपद्धतीचे अनुपालन करून पूर्वीच्या मतदार यादीतील मयत झालेल्या, इतर ठिकाणी स्थलांतरित झालेल्या किंवा दुबार नोंदणी झालेल्या काही मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. अशा वगळण्यात आलेल्या नावांची यादी जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवण्यात येणार आहे.

याद्वारे सर्व राजकीय पक्षांनी आपआपल्या प्रत्येक मतदार केंद्राकरिता त्यांच्या मतदान केंद्रस्तरीय अभिकर्त्यांची नेमणूक करावी, शासनाच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या मदतीने मतदार याद्या अधिक अचूक व परिपूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे. मतदारांच्या सुलभतेसाठी www.nvsp.in या संकेतस्थळावर ऑनलाइन नावनोंदणीची, तसेच यादीतील तपशिलात बदल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. सर्व माहिती एक सप्टेंबर २०१८ पासून संकेतस्थळावर उपलब्ध राहील, अशी माहिती उपमुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिली.